Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

:: परिपत्रक ::

**विषय :** प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेचे अंतर्गत गुण प्रणालीमध्ये भरणेबाबत...

प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षा ८०+२० या गुणपध्दतीने सुरू आहे. त्यानुसार सैध्दांतिक परीक्षेचे २० पैकी अंतर्गत गुण प्रणालीमध्ये भरून परीक्षा विभागाकडे पाठविणे ही नियमित प्रक्रिया विद्यापीठ अधिविभाग/संशोधन केंद्रांकडून पार पाडली जाते. तथापि, सद्यपरिस्थितीमध्ये सदरची प्रक्रिया पार पाडताना उशीर होत असल्याने त्याचा परिणाम निकाल घोषित करण्यावर होत आहे.

वास्तविक, अंतर्गत परीक्षेचे गुण सैध्दांतिक परीक्षा सुरू होण्यापूर्वी प्रणालीमध्ये भरून, कन्फर्मेशन झाल्यानंतर त्याची हार्डकॉपी मा. अधिविभागप्रमुख/मा.समन्वयक यांच्या स्वाक्षरीने परीक्षा विभागास लवकरात लवकर सादर केल्यास निकाल घोषित करण्याची कार्यवाही करण्यामध्ये सुलभता येईल.

या अनुषंगाने संबंधित सर्व अधिविभाग/संशोधन केंद्र यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, प्री-पीएचडी कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षेचे २० पैकी अंतर्गत गुण योग्य ती दक्षता घेऊन कोर्सवर्क सैध्दांतिक परीक्षा सुंरू होण्याअगोदर परीक्षा विभागास सादर करावेत.

बीएस्सी-एमएस्सी परीक्षा विभाग/१३५
दि. १२.०८.२०२४
१६

डॉ. अजितसिंह जाधव
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत,
मा. अधिविभागप्रमुख/मा.समन्वयक, संबंधित सर्व अधिविभाग/संशोधन केंद्रे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

इंटरनेट सेल : विद्यापीठ संकेतस्थळावर Exam Circular येथे प्रकाशित करावे. (प्रसारण कालावधी - सदरचे परिपत्रक वारंवार निदर्शनास येणे अपेक्षित असल्याने दिर्घ मुदतीकरिता)